● शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ११० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘विकास का पन्ना लिखेंगे कैलास अण्णा’

## घोषणाबाजींनी शहर काँग्रेसमय; महाविकास आघाडीचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांची पदयात्रा





**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार आ.कैलास गोरंट्याल यांनी आज शुक्रवारी सकाळी जुना जालना भागात पदयात्रा करत मतदारांशी संवाद साधला. यावेळी विकास का पन्ना लिखेंगे कैलास अण्णा, कैलास सेठ तुम आगे बढो हम तुमारे साथ हैं सारख्या घोषणा देण्यात आल्या. ढोल ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या या पदयात्रे दरम्यान आ. गोरंटयाल यांचे फटाक्यांची आतषबाजी आणि फुलांची उधळण करत जोरदार स्वागत करून विजयी करण्याचा निर्धार मतदारांनी केला.

जुना जालना भागातील छत्रपती संभाजी उद्यान जवळ असलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या या पदयात्रेत सहभागी झालेल्या महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आ.कैलास गोरंटयाल तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, विकास का पन्ना लिखेंगे कैलास अण्णा आदी घोषणा देत मतदारांचे लक्ष वेधून घेतले. छत्रपती संभाजी उद्यान येथून काढण्यात आलेली ही पदयात्रा पंचायत समिती कार्यालय, मुक्तेश्वर द्वार, कचेरी रोड, गणपती गल्ली चौक, शनी मंदिर चौक, टाऊन हॉल या मार्गे जाऊन गांधी चमन येथे समाप्त करण्यात आली. या पदयात्रे दरम्यान उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी मतदारांसह विविध व्यावसायिक, व्यापारी आदींच्या भेटी घेवून त्यांच्याशी संवाद साधत येत्या विधानसभा निवडणुकीत आपल्याला भरघोस मतांनी विजयी करण्याचे साकडे मतदारांना घातले. पदयात्रा मार्गावर उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांचे अनेक महिला भगिनींनी औक्षण करुन मिठाई भरवत स्वागत केले. पदयात्रा गांधी चमन येथे पोहचल्यानंतर उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी महात्मा गांधी आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या पदयात्रेत काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, महावीर ढक्का, बदर चाऊस, शेख शकील, दिनकर घेवंदे, अब्दुल रफीक,वाजेद पठाण, गंगुबाई वानखेडे, मंगलबाई खांडेभराड, विजय पवार, रावसाहेब अवघड, गणेश वाघमारे, संजय भगत, गजानन लाड, संतोष कुंडलकर, संतोष औरंगे, साईनाथ जैस्वाल, योगेश लाड, शिवराम सतकर, संतोष माधोवाले, किशोर गरदास, पुरुषोत्तम बिंगी, शेख वसीम, व्यंकटेश चित्राल, अमजद पठाण, नरेश गोगडे, बाळू लाड, रामेश्वर लाड, योगेश पाटील, अमोल सरोदे यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

---

**युवा आदर्श**

**सत्ता ...**

आपल्याचं कुटुंबा
राहो कायम सत्ता
सारे एका माळेचे
गिरवा तोच कित्ता
बाकी उमेदवारांचा
सफाचट करे पत्ता
माझे वगळले नाव
मलाचं नाही पत्ता
करणार नसाल पुरे
का आश्वासने देता
घरे तुमची सावराय
मदत आमची घेता
आमचे घेऊन सारे
म्हणे स्वतांस दाता
नशीब तुमचे हाती
मानू लागे विधाता
पक्ष उरलेला आता
फक्त परिवारा पुरता
सामान्य कार्यकर्ता
राहिला नावा पुरता
नातवंडा पोरा सोरा
खुर्चीवर बसवे आता
मी त्याग केले सगळे
गुणगान करतो नेता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

अब्दुल हाफिज यांच्या प्रचार सभेत शेख माजेद यांची चौफेर फटकेबाजी

# अब्दुल हाफिज यांना एक्सप्रेस हायवेने विधानसभेत पाठवा - शेख माजेद

## गंगाधरही शक्तीमान है; हातात कमळवाला नको आता हातात पेनवाला हवायं

**जालना । प्रतिनिधी -** गंगाधरही शक्तीमान है, त्याला ओळखा; सगळे म्हणताहेत एका जाती-धर्मावर निवडणुका होत नाही. हे खरे आहे पण अडीच हजार मतदार असलेला तीन वेळा आमदार होऊ शकतो तर ९० हजार मतदार संख्या असलेल्या मुस्लीम समुदायातून आमदार का होणार नाही असा प्रश्न उपस्थित करत आता हातात कमळ वाला नको आता हातात पेनवाला हवाय म्हणत १५ नंबर समोरील सात किरणांसह पेनाच्या निब समोरील बटन दाबून एक्सप्रेस हायवेने अब्दुल हाफिज यांना विधानसभेत पाठवा असे आवाहन शेख माजेद यांनी उपस्थित जनसमुदायास संबोधित करतांना येथे केले. ते रेल्वे स्टेशन परिसरात आयोजित प्रचार सभेत बोलत होते. यावेळी अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज, शब्बीर अन्सारी, जमील मौलाना, फेरोज अली, सोहेल सिद्दीकी, जोहेब अन्सारी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात येत आहे. राजकीय पक्ष तसेच अपक्षांकडूनही निवडणुकीत विजयासाठी जोर लावला जात आहे. जालना विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांनीही प्रचारात आघाडी घेतली असून त्यांच्याकडून विजयाचा दावा केला जात आहे.

रेल्वे स्टेशन परिसरात शुक्रवार (दि १५) सायंकाळी झालेल्या प्रचार सभेत शेख माजेद यांनी विविध मुद्द्यांना हात पान २ वर





जालना येथील कालिका स्टीलचे संचालक तथा स्टील असोसिएशन अध्यक्ष घनश्याम गोयल यांनी छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा विमानतळ येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत केले.

दिवाळीच्या सुट्टीत लोककलेचा आनंद, शालेय विद्यार्थ्यांनी गिरवले लोककलेचे धडे

# शिबिरार्थींनी एकापेक्षा एक सरस लोककलांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली

**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग आणि लोकपरिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने आयोजित दिवाळी लोककला प्रशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी शिबिरार्थींनी एकापेक्षा एक सरस लोककलांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

महाविद्यालयाच्या केंद्रीय सभागृहात आयोजित या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून जालनाचे सुप्रसिद्ध तबला वादक डॉ.प्रसाद चौधरी, डॉ. मोहिनी रायबागकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर व्यासपीठावर डॉ. यशवंत सोनुने, शाहीर रामानंद उगले, लोककला विभागाचे प्रमुख आणि शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवराच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. नंतर 'नमो शारदे तुला गणपते' हा गण शिबिरार्थी स्वानंद धुमाळ, संविधान इंगोले, श्रेयस महाजन यांनी सादर केला. त्यानंतर शिवरायांना मानवंदना म्हणून 'जय जिजाऊ जय शिवराय' हे गीत सोहम वाटसर, धनराज घुले, प्रणव काटे, प्रथम वाटसर यांनी सादर केले. 'माझ्या शिवाजी राजांना स्वराज्य घडवलं' हे गीत स्वानंद धुमाळ या बालशाहीरने सादर केले, या गीताला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त पान २ वर



झाडे लावा झाडे जगवा

संपादकीय पान

# भूदान चळवळीचे प्रवर्तक

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची १५ नोव्हेंबर रोजी ४२ वी पुण्यतिथी होती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव



धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जॉय वर्धापन दिना निमित्त होणार पुरस्कार वितरण

**मुंबई -** जॉय ऑफ गीविंग सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन येत्या फेब्रुवारी महिन्यात साजरा होणार असून या निमित्ताने समाजातील विविध घटकांसाठी काम करणाऱ्या मान्यवरांना आदर्श शिक्षक शिक्षिका, आदर्श सामाजिक कार्यकर्ता, आदर्श पत्रकार, आदर्श वृत्तपत्र लेखक, आदर्श संपादक, जीवन गौरव पुरस्कार, आदर्श शाळा, आदर्श सामाजिक संस्था असे पुरस्कार देण्यात येणार असून इच्छुकानी आपले प्रस्ताव दिनांक १५ जानेवारी २०२५ पर्यंत अध्यक्ष गणेश हिरवे जॉय सामाजिक संस्था, २/१२ पार्वती निवास रामनगर बांद्रेकरवाडी जोगेश्वरी पूर्व मुंबई ४०००६० येथे पाठवणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९९२०५८१८७८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पारंपरिक पिक सोडून बटाटा, इतर पिकाकडे कल

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** सोयाबीन पिकाच्या काढणीनंतर शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पारंपरिक पिकांना फाटा देत बटाट्याची लागवड सुरू केली आहे. दिवसेंदिवस बटाट्याचे क्षेत्र वाढत असल्याने मजुरांच्या हातालाही मोठे काम मिळत आहे. परिसरामध्ये यंदा मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती; परंतु अवकाळी पावसाने सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान केले. यातच परिसरातील ओढे-नाले उशिराच्या पावसाने खळखळून वाहू लागले. दरम्यान, सोयाबीनच्या शेतात शेतकऱ्यांनी बटाट्याची लागवड सुरू केली आहे.

सद्यःस्थितीत बटाट्याच्या बेण्याचे दर बावीसशे रुपये प्रतिक्विंटल आहे. रोटाव्हेटर करून शेतामध्ये मशीनच्या सहायने वरंबे तयार केले जात आहेत. यावर ठिबक अंथरून शेतकरी वरांब्याच्या दोन्ही बाजूने बटाट्याची लागवड करतात. दरम्यान, लागवडीपूर्वी बटाट्यांना बुरशीनाशक व कीटकनाशकांच्या द्रावणातून बाहेर काढले जाते. यानंतरच त्याची लागवड केली जाते. साधारणतः बारा दिवसांनंतर बटाट्याचे डोळे पालवी फोडतात. बटाट्यासाठी शेतकऱ्यांकडून भुसभुशीत जमिनीचा वापर केला जातो. यासाठी योग्य खताचे नियोजन पाण्याची मात्रा व निगा राखल्यास मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ शकते, असे बटाटे उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले.

६६ आपण एक एकर शेतामध्ये बटाट्याची लागवड केली आहे. जवळपास साडेसहा क्विंटल बियाणे लागवडीसाठी लागले. वरंबा पद्धतीवर चार फुटाचे अंतर ठेवून लागवड करण्यात आली. यासाठी महिला मजुरांना लागवडीचा खर्च द्यावा लागला. याशिवाय तेरा हजार रुपयांचे बेणे, तर ३ हजार रुपयांचे रासायनिक खते लागवडीला लागले. या एक एकर क्षेत्रात ७० ते ८० क्विंटल बटाट्याचे उत्पन्न होण्याची अपेक्षा असल्याचे बटाटा उत्पादक ज्ञानेश्वर उखर्डे यांनी सांगितले आहे.

पान १ व ४ वरुन

## अब्दुल हाफिज ...

घातला. विरोधकांवर टिका करतांना त्यांनी आजी-माजी आमदारांचा रंगा-बिल्ला म्हणून उल्लेख करत हे रंगा आणि बिल्ला आलटून पालटून सत्तेत येतात. त्यांनी कोणतीही विकासकामे केली नाहीत. मागच्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुस्लीम समुदायाने एक गठ्ठा मतदान केल्यामुळे महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे यांचा विजय झाला. हे सांगतांना शेख माजेद यांनी लोकसभेच्या निवडणुक निकालाचा बुथ निहाय आकडा सांगितला. ते म्हणाले कि मुस्लीम बहुल भागात तसेच ज्या भागात मुस्लीम नगरसेवक आहेत त्या भागात लोकसभेत काँग्रेसच्या उमेदवाराला भरभरुन मते आहेत. मात्र, काँग्रेसचेच नगरसेवक असलेले ढक्का, भगत, गौरक्षक जवळपास सर्वच गैरमुस्लीम काँग्रेसच्या नगरसेवकांच्या वार्डा-वार्डात बुथ वर भाजपाच्या उमेदवाराला लिड आहे. लोकसभेत एक-दोन सभा वगळल्या तर काँग्रेसचे आमदार प्रचाराला दिसले का? असा प्रश्नही शेख माजेद यांनी यावेळी उपस्थित केला. कल्याण काळे उमेदवार असतांना ते भेटायला आले किंवा नाही आले याचा विचार आपण केला नाही, त्यांनी कधी चहा दिला नाही. साखर, दाळ, हळद, मिठ, तिखट काहीही दिले नाही तरी आपण सर्वांनी मिळून स्वखर्चाने रिक्षा करत मतदान केंद्र गाठत त्यांना मतदान केले. आता हे लोकांना बिर्याणी खावू घालत आहेत. आपले लोकंच आपल्यात फुट पाडत आहेत. कुणाच्याही भुलथापांना बळी पडू नका, विचार करा गंगाधर कोण आहे आणि शक्तीमान कोण आहे. ये गंगाधरही शक्तीमान आहे. त्याचा खरा चेहरा ओळखा. सगळे म्हणतात एका जाती-धर्मावर निवडणुका होत नाहीत हे सत्य आहे. मात्र, अडीच हजार जात संख्या असलेला तीन वेळा आमदार होऊ शकतो तर ९० हजार मतदार संख्या असलेले अब्दुल हाफिज हे आमदार का होऊ शकत नाहीत? अब्दुल हाफिज यांना गैर मुस्लीम बांधवांचाही पाठींबा आहे. ते मराठी पत्रकार संघाचे १७ वर्ष प्रतिनिधीत्व करत आलेले आहे. त्यामुळे त्यांचा सर्व जाती-धर्मीयांशी सलोख्याचे संबंध आहेत. मुस्लीम मतदार सोडता त्यांना जालना विधानसभेत तीस हजारांपेक्षा अधिक मतदान होणार यांची आम्हाला खात्री आहे. आता जवाबदारी माझी आणि आपली सर्वांची आहे. अब्दुल हाफीज यांना पाठबळ द्या. येणाऱ्या २० तारखेला १५ नंबर, सात किरणांसह पेनाची निब या निशाणी समोरील बटन दाबा आणि एक्सप्रेस हायवेने अब्दुल हाफिज यांना विधानसभेत पाठवा असे आवाहन शेख माजेद यांनी केले.

## शिबीरार्थीनी एकापेक्षा ...

दाद दिली. नंतर संबोधी इंगोले, संचिता भुंबर,स्वानंद यांनी कोळीगीत गीत सादर केले, त्यानंतर श्रेयस महाजन व गणेश साळवे यांनी 'वासुदेव' हा कलाप्रकार सादर केला. संचिता भुंबर, प्रथम वाटसर हिने 'विंचू चावला' हे भारुड सादर केले. धनराज घुले यांनी 'पोतराज' सादर केला सादर केला याबरोबरच या कार्यक्रमात अनेक कलाप्रकार सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिबिरार्थ्यांनी महाराष्ट्रातील लोकवाद्याची 'तालयात्रा' सादर करून प्रेक्षकांना मनमुराद आनंद दिला. महाराष्ट्राची परंपरा व संस्कृती टिकून राहावी, विद्यार्थ्यांना लोककलेचे आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**लोककला ही केवळ कला नव्हे तो महाराष्ट्राच्या संस्काराचा भाग आहे..! - डॉ. प्रसाद चौधरी**

या प्रसंगी बोलताना डॉ.प्रसाद चौधरी म्हणाले की, आपल्या मुलांचे करिअर कुठल्याही क्षेत्रात असू द्या, परंतु मुलांना लोककलेची गोडी निर्माण करा, कारण लोककला ही केवळ कला नव्हे तो महाराष्ट्राच्या संस्काराचा भाग आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी शिबिरार्थीणा सहभाग प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिबिरार्थींच्या वतीने संबोधी इंगोले हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर उदावंत यांनी केले तर शाहीर रामानंद उगले यांनी उपस्थितांचे आभार मानले. या १० दिवसीय शिबिरात १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ यशवंत सोनुने यांच्या संकल्पनेतून हे शिबिर पार पडले. या शिबिराचे संचालक सुप्रसिद्ध गीतकार आणि संगीतकार प्रा. कल्याण उगले, सुप्रसिद्ध शाहीर रामानंद उगले यांनी मार्गदर्शन केले.

## सत्तेचा दुरुपयोग ...

आपण व आमदार कैलास गोरंट्याल हे चौथ्यांदा विजयी चौकार लगावणार आहोत. आमदार गोरंट्याल हे विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे स्टार आमदार म्हणून ओळखले जातात, विकास व जनकल्याणाची तळमळ असलेले आमदार म्हणून ते ओळखले जातात.पिण्याच्या पाण्यासाठी शहरात घागर मोर्चे, पाणी भरण्यासाठी लागलेल्या रांगा हे चित्र बदलून टाकण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी संघर्ष केला व जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली.

जालना शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी पुढाकार घेतला, आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री असतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा तसेच आवश्यक त्या परवानग्या काढून दिल्या, त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय महाविकास आघाडीच्या काळातच मंजूर झाले.आता पुढे येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकाळातच वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन होईल.

सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुती व घटक पक्षांची नेते मंडळी जाती-धर्माचे राजकरण करून जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत आहेत. जनतेने त्यांच्या भुलथापांना बळी पडू नये, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरील रेष आहे, दिनांक २५ नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडी राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जालना शहराच्या भवितव्यासाठी तसेच जालना शहराच्या सुवर्णकाळासाठी सतत विकासाचा ध्यास असलेले आमदार कैलास गोरंट्याल यांना आमदार नव्हे तर मंत्री होण्यासाठी भरघोस मतांनी निवडून द्यावे,

असे आवाहन करुन काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी यांच्या महाविकास आघाडीसाठी निर्माण करण्यात आलेल्या पंचसूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलतांना खासदार डॉ. कल्याण काळे यांनी विकासाचा ध्यास असलेले कर्तव्यनिष्ठ आमदार कैलास गोरंट्याल हे कार्यकर्त्यांसाठी कुठेही भिडणारे नेते आहेत, जालना शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरीसाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे, महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडीचे सरकार निश्चितपणे येणार आहे, या सरकारमध्ये आमदार कैलास गोरंट्याल हे मंत्री म्हणून दिसणार आहेत, विकासाचा ध्यास असलेले आमदार कैलास गोरंट्याल यांना जनतेने पुन्हा एकदा निवडून द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यावेळी बोलतांना म्हणाले की, जालना शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कारखाना झाले आहे, आमदार अमित देशमुख हे वैद्यकीय शिक्षणमंत्री असतांना आपण व आमदार अमित झणक यांनी त्यांच्याकडे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देण्याची विनंती केली होती, तेंव्हा देशमुख यांनी जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देवून ते स्वतः हेलिकॉप्टरने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची जागा बघण्यासाठी जालना शहरात आले होते, शासकीय वैद्यकीय महाविद्याल मंजूर व्हावे, यासाठी आपण विधानसभेच्या आवारात उपोषणाला बसलो. जालना शहरात मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे खरे श्रेय हे आमदार अमित देशमुख यांनाच आहे, इतर कुणीही याचे

श्रेय वाटण्याचा प्रयत्न करता कामा नये. लातूर व जालना जिल्ह्याची निर्मिती एकाच वेळी झाली, लातूर जिल्ह्याला विलासराव देशमुख यांच्या सारखे दमदार नेतृत्व लाभल्याने लातूरचा विकास झाला. याउलट जालन्याचे झाले, १९९० पासून आमदार व दोन वेळा मंत्री राहिलेले खोतकर यांनी शहर विकासाच्या कोणत्याही योजना आणल्या नाहीत, उलट रामनगर साखर कारखाना, लालबाग जिनिंग, देखरेख संघ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून स्वतःचा फायदा करून घेतला. जालना शहरासाठी आपण संघर्ष करून जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली, आता जालना शहरात नवीन जलकुंभ व जलवाहिनीचे कार्य हाती घेण्यात आले आहे, हे कार्य पूर्ण झाल्यावर जालनेकरांना दररोज पाणी पुरवठा केला जाईल. हातवन बृहत प्रकल्प कार्यान्वित करून त्याचे पाणी जालना शहरात आणले गेले तर जालना शहराला मुबलक पाणी मिळेल, याशिवाय खडकपूर्णा धरणातून ७२ गावांना पाणीपुरवठा झाला तर या गावातील पाणी प्रश्न सुटेल. जालना शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी करत आपणास जनतेने भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहनही आमदार गोरंट्याल यांनी यावेळी केले.

यावेळी राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, नामदेव पवार डॉ. पी. सी. शर्मा आदींनी जालना शहराच्या विकासासाठी आमदार कैलास गोरंट्याल यांना निवडून द्यावे, असे आवाहन केले. सभेचे संचालन राम सावंत यांनी केले तर दिनकर घेवंदे यांनी आभार मानले.

या जाहीर सभेस अकबरखाँ बनेखॉ,मधुकर घेवंदे,विजय चौधरी,दुर्गेश काठोठीवाले, विजय पवार, मनकर्णाबाई डांगे, विनोद यादव यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते , महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# प्रभू श्री रामाचे आशीर्वाद घेऊन प्रचाराला सुरुवात



**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना महायुतीचे अधिकृत लोकप्रिय उमेदवार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या प्रचारार्थ शुक्रवार (दि. १५ नोव्हेंबर २०२४) रोजी प्रभाग क्रमांक. १५ (श्री राम मंदीर, बैदापुरा परिसर, कपडा बाजार, भावसार गल्ली, चाटीगल्ली, काजीपुरा, टांगा स्टँड, काद्राबाद, सराफा गल्ली)

येथील स्थानिक नागरिकांची सौ. सीमा खोतकर यांनी भेट घेऊन डोअर टू डोअर प्रचार केले. या प्रचार प्रसंगी शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार बंधू भगिनींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून त्याबद्दल सर्वांचा आभारी आहे.

## महायुतीचे उमेदवार खोतकर यांच्या गाव-तांड्यावर भेटीगाठी

# जनता जर्नाधनाच्या आशीर्वादाने विजयी होणार - खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** मागील पाच वर्षात जनतेला तोंडही न दाखविणारा काँग्रेसचा उमेदवार निवडणुकीतही लोकापर्यंत पोहोचू शकलेला नाही. याउलट शहरातील ३० वार्डांमधील प्रत्येक कॉलनी आणि ग्रामीण भागातील सर्व गावे, तांड्यावर जाऊन आपण प्रत्यक्ष भेट देऊन जनतेचे आशीर्वाद घेतले आहेत. त्यामुळे लोकांमधून होत असलेले उत्स्फूर्त स्वागत हीच आपल्या विजयाची साक्ष असल्याचे महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे.

श्री. खोतकर यांनी मौजपूरी, पाहेगांव, निरखेडा व तांडा, लक्ष्मीनगर तांडा, दहीफळ, मंठा रोड प्रजापती ब्रम्हाकुमारी परिसरातील मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी युवा, महायुती, महिला आघाडी, शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची जालन्यात विराट सभा झाली. त्यानंतर लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी काँग्रेस उमेदवाराकडे अक्षरशः पाठ फिरविली आहे. महिलांच्या योजना बंद करू पाहणार्या काँग्रेसच्या उमेदवाराला आपण मतदान करणार नाही असे महिलांनीच ठरवून टाकले आहे. जालना मतदारसंघाच्या विकासासाठी एक हजार कोटी रुपये देण्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळे उद्योजक, व्यापारी आणि सर्व जालनेकरांना विकासाचा विश्वास निर्माण झाला आहे. शेतीसाठी मागेल त्याला सौर पंप, शेततळे योजना सुरू आहे. शेतकर्यांना आता पंधरा हजार रुपये अनुदान वाढ दिली जाणार आहे. मुलींसाठी, महिलांसाठी, वृद्धांसाठी, शेतकर्यांसाठी, अपंगांसाठी, तरुणांसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यासाठी आता वाढीव आर्थिक तरतूदही केली जाणार आहे. त्यामुळे सर्व समाजघटकांचा विश्वास महायुतीच्या सरकारने जिंकला आहे. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर जालना मतदारसंघाला कॅबिनेट मंत्रीपद मिळणार आहे. त्यामुळे जालना शहर आणि ग्रामीण भागाचे भाग्य उजळल्याशिवाय राहणार नाही.



कपटनीतीचा वापर पराभव दिसू लागल्याने आपल्या विरोधकाकडून कपटनीती सुरू झाली आहे. स्वतः केलेल्या विकासाचे एकही उदाहरण सांगता येत नसल्याने खोटेनाटे आरोप करून आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण लोकांनी या कांगावाखोर काँग्रेस उमेदवाराला ओळखले आहे. आमदार नसतानाही आणि केवळ एक वर्षाच्या आतच ४०० कोटीचा निधी आणने सोपे काम नाही. शहरांमध्ये सुरू झालेल्या या विकास कामामुळे लोकांचा विश्वास वाढला आहे.

शेतकर्यांचा कारखाना सुरू करणार भुईमुगाच्या शेंगा जमिनीवर येतात की खाली हेही ठाऊक नसलेल्या काँग्रेस उमेदवाराकडून रामनगर साखर कारखान्याबद्दल दिशाभूल केली जात आहे. निवडणूक झाल्यानंतर आपण पहिले प्राधान्य कारखाना उभारणीस देणार आहोत. राज्यात आणि देशातही युतीचे सरकार राहणार असल्याने कारखाना उभारणीस कोणतीही अडचण आता येणार नाही. हातवणसारखा सिंचन प्रकल्पही उभा राहणार आहे. आपल्या परिसरात उसाचे क्षेत्र वाढणार आहे. कारखाना उभारल्यानंतर रामनगर परिसर पुन्हा शेतकरी, कामगार, व्यापारी, उद्योजक यांच्या गर्दीने फुलणार आहे. दरम्यान शहर आणि ग्रामीण भागातून मिळत असलेला उत्स्फूर्त आणि वाढता पाठिंबा लक्षात घेता आपला विजयसुद्धा मोठा होणार असल्याचे खोतकर यांनी स्पष्ट केले

# लायन्स क्लबतर्फे बालदिन साजरा



**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे आझाद मैदान येथील किड्स प्लॅनेट स्कूलमध्ये बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी पसरिता बगडिया, कमलकिशोर बगडिया आणि अनिता देविदान यांच्यावतीने मुलांना पौष्टिक लाडू व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कविता वाचन आणि विविध उपक्रमात सहभाग नोंदविला. शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती लुनिया आणि सर्व शिक्षकांनी एक विशेष कार्यक्रम आयोजित करून मुलांसोबत बालदिन साजरा केला.

यावेळी लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, सहकोषाध्यक्ष भारती लोहिया, संगीता रुणवाल, अतुल लड्ढा आणि राजेश लुनिया यांची प्रमुख उपस्थिती होती. बालदिनाचे महत्त्व अधोरेखित करून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांची गरज मान्यवरांनी व्यक्त केली. या कार्यक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला.

# जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील सन २०२४-२५ या शैक्षणिक राखीव जागेवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, वि.जा., भ.ज., इमाव, विमाप्र, एस.ई.बी.सी. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, वास्तूशास्त्र, फार्मसी, विधी व बी.एड या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करण्याची कार्यवाही जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या स्तरावर सुरु आहे. दि.१८ ते २९ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सकाळी ११ ते ५ या वेळेत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहीम समिती कार्यालयाकडून हाती घेण्यात आली आहे. तरी जिल्हा जाती पडताळणी समितीकडे प्रलंबित अर्ज तसेच त्रुटीच्या पुर्ततेसाठी विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जाती पडताळणी समिती, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# परतूर मतदारसंघात इव्हीएम मशीन झाल्या सज्ज



**परतूर । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीसाठी दि.१४/११/२०२४ रोजी इव्हीएम मशीनची सिलिंग प्रक्रिया पूर्ण झाली असून इव्हीम मशीनसह व्हिव्हीपॅट मशीन २० नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या मतदानासाठी सज्ज ठेवण्यात आल्या असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी दिली. दरम्यान,मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ४० विविध पथकातील कर्मचाऱ्यांनी हे काम पूर्ण केले.२२ मशीनमधून एक हजार मतांसाठी अभिरूप मतदान घेण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

९९ परतूर विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी आता शेवटच्या टप्प्यात आली आहे.आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सभागृहात दि. १३ व १४ नोव्हेंबर रोजी इव्हीएम मशीनची सिलिंग प्रक्रिया संपन्न झाली. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानासाठी इव्हीएम मशीन आता तयार झाल्या आहेत.यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे,लक्ष्मीकांत खळीकर,दिलीप कुलकर्णी, विनोद भालेराव,कुलदीप कुलकर्णी,संतोष पवार, बोलचेटवार,संजय कास्तोडे, जावेद पठाण,श्रीकृष्ण पाटोळे,सोपान वडेकर,बाबा भापकर, कैलास उफाड, ज्ञानेश्वर ढवळे,कृष्णा सोनवणे यांच्यासह निवडणूक कर्मचारी उपस्थित होते.

# ... व्हॉटस्‌अप ग्रुपचा अ‍ॅडमिन जवाबदार; वादग्रस्त पोस्ट टाळण्याचे सपोनी खामगळ यांचे आवाहन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील पोलीस स्टेशन अंतर्गत सर्व नागरिकांना याव्दारे कळविण्यात येते की, विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ पासुन ते दिनांक २५/११/२०२४ रोजी पर्यंत आदर्श आचारसंहितेचा अंमल असुन जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सार्वत्रिक निवडणुक - २०२४ चे मतदान दिनांक २०/११/२०२४ रोजी व निकाल दिनांक २३/११/२०२४ रोजी जाहीर होणार आहे. तरी कोणीही नागरिक सोशल मिडीयाव्दारे फेसबुक, इंन्स्टाग्राम, व्हॉटसअप ग्रुप व इतर तत्सम ॲप्लीकेशनच्या माध्यमाव्दारे कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरुपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी स्टेटस, डिजीटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाव्दारे करू नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डिजे वाजवू नयेत, फटाके फोडणार नाही, रंग, गुलाल उधळणार नाही. संबंधीत विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही राजकीय कार्यक्रम करु नयेत. व्हॉटसअप ग्रुपचे ऍडमिन यांनी दिनांक १५/१०/२०२४ ते दिनांक २५/११/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटींगमध्ये ओन्ली ऍडमिन करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त



पोस्ट ग्रुपवर टाकरणार नाहीत, जर सेटिंगमध्ये बदल केला नाही व कोणी सदस्यांनी वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट बद्दल जबाबदार धरून योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे आवाहन सपोनी सचिन खामगळ पोस्टे टेंभुर्णी जालना यांनी केले आहे.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# जिल्ह्यातील कामगारांना मतदानासाठी २० नोव्हेंबर रोजी भरपगारी सुट्टी

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर सर्व आस्थापना मालकांनी त्यांच्याकडील कामगारांना बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सवलत देणे आवश्यक आहे. तरी जालना जिल्ह्यातील कामगारांना शासन परिपत्रकानूसार २० नोव्हेंबर रोजी विधानसभासभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

जालना जिल्ह्यात बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी पाच विधानसभा मतदारसंघात मतदान होणार असून या दिवशी सर्व निवडणूक क्षेत्रातील सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनामधील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करावी तसेच निवडणूक होणाऱ्या लगतच्या क्षेत्रात औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) येथे मोठ्या नागरी वसाहती वसलेल्या आहेत. अशा ठिकाणी नोकरी निमित्ताने कामास येणाऱ्या संबंधीत मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, या दृष्टीने मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टीची विशेष सवलत देण्यात यावी, असे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २४ ऑक्टोबर,२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये आदेशीत केले आहे. याबाबतीत उदभवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जालना येथील सरकारी कामगार अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापना करण्यात आलेला असून संबंधित कामगार, कामगार संघटनांनी दुरध्वनी क्र. ०२४८२-२३०२९६ यावर संपर्क साधावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## दिव्यांग मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न

# दिव्यांग मतदारांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध उपाययोजना - जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांसाठी स्वीप कार्यक्रमातंर्गत जालना जिल्ह्याचे दिव्यांग आयकॉन डॉ. निकेश मदारे यांच्यासोबत मागील काही दिवसापासून स्वीपच्या माध्यमातून दिव्यांग मतदारांपर्यंत पोहचण्याचे काम झाले आहे. जवळपास ३ हजार मतदारांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचण्याचे काम करण्यात येवून क्षेत्र भेटीसुध्दा दिलेल्या आहेत. दिव्यांग मतदारांचे क्षेत्रीयस्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.



दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रावर व्हिलचेअरचे वाटप व दिव्यांग मतदान जनजागृती कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात आज घेण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी दिव्यांग आयकॉन डॉ. निकेश मदारे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, दिव्यांग कक्ष नोडल अधिकारी अनंत कदम, सहायक नोडल अधिकारी अतिश ससाणे, श्री. अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात जवळपास १४५०० दिव्यांग मतदार आहेत. त्यांच्यात जनजागृती होण्याच्या उद्देशाने स्वीप कक्षाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्व मतदान केंद्रावर व्हीलचेअर वाटपाचा कार्यक्रम आज घेण्यात आला. सर्व दिव्यांगाना मतदान करतांना सुलभता यावी यासाठी ब्रेल लिपीमध्ये मतपत्रिका तसेच अंध मतदारासाठी ब्रेल व्होटर स्लिप येथून वाटप करण्यात येत आहे. तसेच साईन लॅग्वेजही तयार केलेली आहे. हे सर्व संबंधित दिव्यांग मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सक्षम प कार्यान्वित केलेले आहे. यावर नोंदणी केलेल्या दिव्यांगांना मतदार केंद्रावर घेवून येणे व मतदानानंतर घरी नेवून सोडणे, तसेच ज्या दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचता येत नाही त्यांच्यासाठी गृह मतदान करुन घेण्यात येत आहे. अशी माहिती दिव्यांग आयकॉन डॉ. मदारे यांनी यावेळी दिली. यावेळी आम्ही मतदान करणार आहेत, आपणही अवश्य मतदान करा, असे आवाहन उपस्थित सर्व दिव्यांग मतदारांनी जिल्ह्यातील सर्व मतदारांना उद्देशून केले.

# जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ व पोलीस अधिक्षक बन्सल यांनी केली भोकरदन विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणी व मतदान केंद्राची पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी आज १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी केंद्र आणि मतदान केंद्राना आज भेट देवून पाहणी केली.

यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, प्रशिक्षणार्थी आयएएस अरुण एम, १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. दयानंद जगताप, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संतोष बनकर आदींची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी डॉ. पांचाळ यांनी १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील नगर परिषदेच्या मंगल कार्यालयातील मतमोजणी केंद्राना प्रत्यक्ष भेट देवून मतदान यंत्रे (इव्हीएम) सज्ज करण्याच्या प्रक्रिये दरम्यान उमेदवारांच्या नावांची तपासणी करुन एका मशीनवर ‘मॉकपोल’ करून व्हीव्हीपॅटद्वारे दिसणाऱ्या चिठ्ठीचीही खात्री करुन घेतली. तसेच यावेळी स्ट्रॉन्ग रुमला भेट देवून रॅन्डमझायशेन प्रक्रियेनुसार मतदान यंत्रे (इव्हीएम) असल्याची देखील त्यांनी खात्री करुन घेतली. यावेळी डॉ. पांचाळ यांनी यावेळी १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील भोकरदन येथील न्यु हायस्कुल आणि नांजावाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्र तसेच १०२ बदनापूर विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्राना भेट देवून पाहणी केली. तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्रावर आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधांचे नियोजन करण्याच्या यावेळी सूचना दिल्या.

# सत्तेचा दुरुपयोग करुन पक्ष फोडाफाडीचे राजकारण करणाऱ्या महायुतीची सत्ता येणार नाही - आ. देशमुख

## जालनेकरांच्या भवितव्यासाठी आ. गोरंट्याल यांना मतदान करण्याचे केले आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुतीची नेते मंडळी पुढे सत्ता येणार नाही, या भीतीने जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत असून कोणत्याही भुलथापांना बळी न पडता जनतेने जालनेकरांच्या भवितव्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आम दार कैलास गोरंट्याल यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन माजी मंत्री आम दार अमित देशमुख यांनी आज येथे केले. आमदार कैलास गोरंट्याल व आपण स्वतः निश्चितपणे विजयाचा चौकार मारणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जालना विधानसभा म तदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ जालना शहरातील सुयेशा लॉन्स येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विचारपिठावर खासदार डॉ. कल्याण काळे, उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल, जालना लोकसभेचे पक्षनिरिक्षक डॉ. पी. सी. शर्मा, पक्षनिरिक्षक नामदेव पवार, आमदार राजेश राठोड, जालना जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र राख ,माजी आमदार संतोष सांबरे, कॉँग्रेसचे प्रदेश सचिव कल्याण दळे,राष्ट्रवादी कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशम ुख, शिवसेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, रिपाइंचे ( गवई गट) जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे,म हिला कॉँग्रेसच्या अध्यक्षा नंदा पवार,मुरलीधर शेजूळ, शिवाजी शेजूळ, प्रभाकर पवार, कॉँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस,कल्याण बोराडे, बाबुरावमामा सतकर, राम कुराडे,ड.सय्यद तारेख आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आमदार देशमुख पुढे म्हणाले की, आमदार कैलास गोरंट्याल हे मराठवाड्यातील कॉँग्रेस पक्षाचे सर्वात सिनियर आमदार आहेत, **पान २ वर**






मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि लोकशाहीने दिलेला हा आपला अधिकार आहे. त्यामुळे

चला मतदान करूया,
आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावूया

माझं मत
माझा अधिकार



तुमचे अमुल्य मत
तुमचा विकास घडवेल
लोकशाहीला बळकट करेल

आमचे वाचक,
जाहिरातदार, हितचिंतक
यांच्यासह सर्व
मतदार जनतेस
आवाहन आहे की,
येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी
मतदान अवश्य करा...
-संपादक, युवा आदर्श




एक नैतिक मतदार व्हा...

निवडणुकीत लाच घेणे आणि लाच देणे अपराध आहे. मतदानासाठी पैसे, मद्य किंवा मोफत भेटवस्तू यांचा समावेश लाचेमध्ये होतो.

cVIGIL

सीविजील मोबाईल ॲप डाऊनलोड करा, गैरव्यवहाराच्या घटना नोंदविण्यासाठी छायाचित्र/व्हिडीओ क्लिक करुन अपलोड केल्यास भरारी पथक हे कार्यवाही करण्यासाठी ऑटो लोकेशनच्या मदतीने त्वरीत घटनास्थळी पोहचतील.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282.

अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.